# प्रेस नोट

दि.०१/०८/२०१८

## शिर्डी नगर पंचायतचे मुख्य लिपीक मुरलीधर बाजीराव देसले व त्यांची पत्नी यांचे विरुध्द अपसंपदेचा गुन्हा दाखल

प्रस्तुत बातमीतील हकिगत अशी की, आरोपी नामे मुरलीधर बाजीराव देसले, मुख्य लिपीक, नगर पंचायत शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर यांनी ते शासकीय सेवेत असतांना गैरमार्गाने डिसेंबर १९९४ ते डिसेंबर २०१० या कालावधीत एकुण १७,३०,६१८/– रू. ची अपसंपदा त्यांच्या ज्ञात उत्पन्नाच्या स्त्रोतापेक्षा एकुण उत्पन्नाचे ९२ टक्के अधिकची संपादीत केल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याने व त्यांची पत्नी सौ.रेखा मुरलीधर देसले यांनी सदर अपसंपदा संपादित करण्यासाठी सहाय केल्याचे निष्पन्न झालेने त्यांचे विरूध्द शिर्डी पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १३(१)(ई) सह १३(२) व भादंविक १०९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर युनिटने केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयामार्फत सर्व सामान्य जनतेला आवाहन करण्यात येते की, त्यांना त्यांचे शासकिय काम करुन देण्यासाठी कोणी शासकिय लोकसेवक कामाच्या बदल्यात लाचेची मागणी करत असेल तसेच शासकीय लोकसेवकाने त्याचे ज्ञात उत्पन्नाचे स्त्रोतापेक्षा जास्त मालमत्ता संपादित केली असेल तर त्याचे येहिशेबी मालमत्तेच्या माहिती बाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, अहमदनगर येथे संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| कार्यालयाचा पत्ता | पोलीस उप अधीक्षक कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर |
| फोन नंबर | ०२४१–२४२३६७७, मोबाईल नंबर ९८२३१९५०९४ |
| टोल फ्रि नंबर | १०६४ |

(किशोर चौधरी)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर